


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : ३०२ वा | सोमवार दि १६ फेब्रुवारी २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# बोगस दिव्यांग प्रमाणपत्राचा भंडाफोड?

## १६ फेब्रुवारीला निर्णायक तपासणी; जिल्हा परिषदेत खळबळ

## मुंढे साहेबांना खऱ्या दिव्यांगांकडून कडकडीची विनंती बुलडाण्याकडे आपले लक्ष केंद्रित करा लई आशीर्वाद मिळेल

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा परिषदेत बोगस दिव्यांगत्व प्रमाणपत्रांच्या आधारे नोकरी, बढती,बदली आणि विविध शासकीय सवलती मिळवल्याचा गंभीर आरोप समोर आला असून प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे.खऱ्या आणि गरजू दिव्यांग उमेदवारांवर अन्याय झाल्याची चर्चा जोर धरत असतानाच आता १६ फेब्रुवारी रोजी होणारी शारीरिक तपासणी निर्णायक ठरणार आहे. राज्य शासनाच्या दिव्यांग कल्याण विभागाच्या १८ सप्टेंबर २०२५ च्या पत्रानुसार दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या कलम ९१ अंतर्गत प्रमाणपत्रांची पडताळणी सुरू करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी जिल्हा शल्य चिकित्सकांना पत्र पाठवून सर्व दिव्यांग अधिकारी, कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची प्रत्यक्ष तपासणी करून सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. यापूर्वी आयोजित शिबिरात २०० पैकी केवळ ६० कर्मचारी उपस्थित राहिल्याने संशय अधिकच बळावला आहे. काही जण जाणीवपूर्वक तपासणीपासून दूर राहिले का,असा सवाल उपस्थित होत आहे. दिव्यांग कल्याण बोर्डाचे सचिव तुकाराम मुंढे यांच्या सूचनेनंतर राज्यभर पडताळणी मोहीम वेगात सुरू झाली असून बुलढाण्यातील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. १६ फेब्रु २६ सोमवारी होणाऱ्या विशेष शिबिरात तपासणीदरम्यान




कोणतीही विसंगती आढळल्यास संबंधित प्रकरणे वैद्यकीय बोर्डाकडे पाठवून अकोला येथे पुढील पडताळणी केली जाणार आहे. खोट्या प्रमाणपत्रांच्या आधारे लाभ घेतलेल्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई होणार का? याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. १६ फेब्रुवारीची तपासणी बोगस दिव्यांगांचे पितळ उघडे पाडणार का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. दैनिक जनसंचलन टीमचा बुलडाणा जिल्हा परिषद येथे बोगस दिव्यांग प्रमाणपत्राचा विविध शासकीय लाभ घेणाऱ्या व खऱ्या दिव्यांगाना डावलून अर्थपूर्ण सोयीनुसार फायदा घेणाऱ्यांचे हजारो खरे चेहरे आम्ही तसेच नियमबाह्य आरोग्य तपासणीतील बनवाबनवी अस्पष्ट व अपूर्ण आदेश तपासणी कोणाची करायची? यादी नाही.की फक्त तपासणी साठी ओरीजिनल दिव्यांगच पाठावायचे हा हेतू आहे? झालेल्या तपासणीत ही फक्त ६० च कर्मचारी हजर का झालेत? अनुपस्थित कर्मचारी यांचेवर आदेशाचे पालन न केल्यामुळे कारवाई का करण्यात आली नाही? सोमवार १६ फेब्रु २६ ला किती कर्मचारी तपासणी ला पाठविणार याबाबत माहिती दिली नाही? मिळालेल्या माहिती नुसार आमचा दावा आहे संपूर्ण महाराष्ट्रात बुलडाणा जिल्ह्यात सर्वाधिक दिव्यांग कर्मचारी आहेत,मग त्यांची सखोल खरी तपासणी एक दिवसात होईल का ? दिलेल्या त्या पत्रामुळे हा फक्त एक फार्स दिसतो.भ्रष्टाचारांचे कर्दनकाळ आदरणीय कर्तव्यदक्ष तुकाराम मुंढे यांच्या आदेशामुळे शासन राज्य खबडून जागे झाले. बुलडाणा जिल्ह्यातील जिल्हा परिषद काय फक्त प्रक्रिया म्हणून फक्त हा देखावा करीत आहे का? असे चित्र पहाण्यात येत आहे. बोगस प्रमाणपत्र देणार व घेणार नालायकांचा पापाचा घडा भरला असून बुलडाणा जिल्ह्यात खऱ्या दिव्यांगांना डावलून त्यांचा अधिकारावर अन्याय करणाऱ्या त्या बकासुरांवर व त्यांना साथ देणाऱ्यांवर फोजदारी गुन्हे दाखल होऊन कारवाई करण्याची पीडित दिव्यांगांची मागणी आहे.

# क्षणात उद्ध्वस्त संसार; ३६ वर्षीय चिखलीच्या पत्रकाराचा अपघातात अंत

**जनसंचलन/ चिखली**

चिखली-खामगाव-जालना महामार्गावर छोटा मेरा व असोला दरम्यान भीषण अपघातात चिखलीतील पत्रकार राजेंद्र (राजू) सुरडकर (वय अंदाजे ३६ ते ३७, रा. बेराळा) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे पत्रकारितेच्या वर्तुळात हळहळ व्यक्त होत आहे.



मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सुरडकर हे स्विफ्ट डिझायर कारमधून अन्य तिघांसह प्रवास करत होते. भरधाव वेगात असलेली कार अचानक नियंत्रण सुटून रस्त्यालगतच्या झाडावर जोरात आदळली. अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की गाडीचा पुढील भाग चक्काचूर झाला. चार जणांपैकी राजेंद्र सुरडकर यांना गंभीर दुखापत झाली असून उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. उर्वरित तिघेजण किरकोळ जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. वैद्यकीय क्षेत्रातील जाहिराती व उपक्रमांना प्रोत्साहन देणारे, चिखली परिसरात सक्रिय असलेले सुरडकर यांच्या अकाली निधनाने सर्वत्र शोककळा पसरली आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिस अधिक तपास करत आहेत.

# माझा मित्र



आयुष्यात खूप माणसे भेटतात. प्रसंगी जवळही येतात. पण त्यापैकी फार थोडे मित्र होतात. हे मित्रही आयुष्यभर टिकतात असे नाही. कुठल्या तरी कारणाने काहींशी मतभेद होतात. हे मतभेद कधी वैचारिक असतात तर पुष्कळदा वैयक्तिकही असतात. काही मित्रांचा मात्र फार कटू अनुभव येतो. ते समोर गोड बोलतात आणि पाठ फिरली की, निंदा करायला लागतात. कटकारस्थानेही करतात. ते दूरही जातात. त्यांच्याशी मैत्री केल्याचा पश्चात्ताप करावा लागतो. (अर्थात तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते) फार कमी मित्र असे असतात की, ज्यांच्याशी मैत्री असल्यामुळे कधीच पश्चात्ताप होत नाही. उलट आनंद द्विगुणित होत जातो. अशा फार कमी मित्रांमध्ये अविनाश डोळस यांचा मी समावेश करेन. सतत आनंदी राहणारे, मिस्कील बोलणारे, बोलता बोलता सहज टोप्या उडवणारे माझे मित्र अविनाश डोळस हे फार उदार हृदयी आहेत. त्यांचा सगळ्यात मोठा गुण कोणता असेल तर त्यांना कधी कोणाल मत्सर वाटत नाही. संत तुकारामांनी कोणाही जीवाचा न घडो मत्सर असे म्हटले आहे. संत तुकारामांच्या कल्पनेतला माणूस कोण? असे विचारले तर अविनाश डोळस असे उत्तर देईन. याचा अर्थ अविनाश डोळस यांना जीवनात त्रास झाला नाही, असे नाही. अनेक वेळा अनेक ठिकाणी त्यांना डावलण्यातही आले आहे. तरीही ते कधी कटू बोलत नाहीत. कोणाचा मत्सर करीत नाहीत. सतत चेहऱ्यावर हास्यच असते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे रहस्य काय असा महत्त्वाचा प्रश्न आहे आणि त्याचे उत्तर म्हणजे ते डॉ. बाबासाहेत आंबेडकरांच्या विचारांचे सच्चे पाईक आहेत. पुष्कळ लोक बाबासाहेबांकडे एक वैयक्तिक फायद्याची गोष्ट म्हणून पाहतात. आयुष्यात पुढे जाण्यासाठी डॉ. बाबासाहेबांचे नाव वापरत राहतात. अविनाश डोळस हे असे कधी करणार नाहीत. समाजात शांतपणे काम करीत राहणे, सामाजिक अन्याय अत्याचाराच्या विरोधात सतत संघर्ष करीत राहणे हाच डॉ. आंबेडकरांच्या शिकवणुकीचा खराखुरा अर्थ आहे, हे अविनाश डोळस पक्के जाणून आहेत. म्हणून वैयक्तिक आयुष्यातील करिअरपेक्षा, प्रसिद्धीपेक्षा सामाजिक कार्य त्यांना अधिक महत्त्वाचे वाटते. समाजात समता निर्माण करणारे विचार पेरीत राहणे अधिक महत्त्वाचे वाटते. आणि ते ते सातत्याने करीत राहतात. याच संदर्भात आणखी एका गोष्टीचा निर्देश केला पाहिजे. ते नाशिकहून आलेले आहेत. म्हणजे कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या कर्मभूमीतून आलेले आहेत. काळाराम मंदिराच्या सत्याग्रहाच्या वेळी महाराष्ट्रातील समतेच्या लढ्याचे केंद्र नाशिक होते. पुढे दादासाहेबांनी समतेचा लढा अधिक व्यापक केला. ते भूमिहीनांच्या प्रश्नाला भिडले आणि त्याचे व्यक्तिमत्त्व महाराष्ट्रव्यापी झाले. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील ते एक अग्रणी नेते होते. अविनाश डोळस यांच्या व्यक्तिमत्त्वावर कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे आणि नाशिकला झालेल्या समता संघर्षाचे दाट संस्कार आहेत. म्हणजे नाशिकचे संस्कार आणि दादासाहेब गायकवाड यांच्याशी बांधीलकी घेऊन ते औरंगाबादला मिलिंद महाविद्यालयात शिकायला आले. मिलिंद महाविद्यालय म्हणजे समाज परिवर्तनाची प्रयोगशाळा. या प्रयोगशाळेत ते तावूनसुलाखून बाहेर पडले. एक वैचारिक बैठक त्यांना प्राप्त झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे साहित्य आणि जीवन यांचा त्यांनी जवळून मनःपूर्वक अभ्यास केला. या सगळ्यांमधून अविनाश डोळस हे निर्मत्सरी, आनंदी अणि आपल्या भूमिकेवर ठाम असणारे व्यक्तिमत्त्व घडले. म्हणूनच अनेक गुंतागुंतीच्या प्रश्नांवर ते समतोल भूमिका मांडू शकतात. एका प्रकारे सामाजिक प्रश्नांवर, दलित प्रश्नांवर वैचारिक भूमिका मांडणारे तटस्थ विचारवंत आहेत. म्हणूनच दलितांच्या, शोषितांच्या, वंचितांच्या चळवळीचे ने वैचारिक भाष्यकार आहेत. म्हणूनच त्यांचे अशा प्रश्नांसबंधीचे विवेचन गळे वेगळे असते. समंजस असते. ते कधी आक्रस्ताळेपणा करीत नाहीत की मळ भमिकाही सोडीत नाहीत. त्याचे कारण त्यांना स्वतःपेक्षा समाज मोठा वाटतो. म्हणूनच समाजातील वेगवेगळ्या विचारधारा समजून घेणे, त्यातील संवादी विचारधारांशी संवाद करणे महत्त्वाचे वाटते. त्या दृष्टीने डावी विचारसरणी त्यांना महत्त्वाची वाटते. डाव्या विचारांच्या केंद्रस्थानी कार्ल मार्क्स आहे. परंतु पुष्कळदा मार्क्सचे नाव काढले की अनेकांना त्रास होतो. तसे अविनाश डोळस यांचे नाही. शेवटी डावे समाजातल्या शोषणांसंबंधीच बोलतात आणि कृती करतात. भारतातील जटिल जातिव्यवस्था डाव्यांना कळली नाही, असा त्यांच्यावर आरोप आहे. कळली नाही, असे मी म्हणणार नाही पण जातिप्रश्नांपेक्षा ते आर्थिक प्रश्न महत्त्वाचे मानतात. आर्थिक समता आली की, सर्व प्रश्न सुटतील असे डाव्यांना वाटते. डावे जेव्हा आर्थिक समतेबद्दल बोलतात, तेव्हा ते समाजातील शोषणाबद्दलच बोलत असतात. दलित चळवळी याही शोषणमुक्तीचा विचार करतात. समतेसाठीच संघर्ष करतात. म्हणजे शोषणमुक्ती हा दोन्ही चळवळींना जोडणारा दुवा आहे. हा दुवा अधिक घट्ट झाला पाहिजे असे अविनाश डोळस यांना वाटते. त्या दृष्टीने ते डाव्या चळवळींकडे पाहतात. डावे आणि दलित जवळ येणे ही काळाचीही गरज आहे. नाहीतर भांडवलशाही सर्वच शोषितांना उद्ध्वस्त करायला तयारच आहे. मग डावे आणि दलित चळवळी जवळ का येत नाहीत हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. आणि त्याचे उत्तर इतिहासामध्ये सापडते. असे अविनाश डोळस यांचे म्हणणे आहे. इतिहासामध्ये डाव्या चळवळीकडूनही जशा चुका झाल्या तशाच दलित चळवळीकडून झाल्या. शेवटी चुकांवरती मात करणे हेच आपल्या हाती असते. ती काळाची गरज असते. ही काळाची खेळी ओळखणारे आणि दोन्ही चळवळी जवळ आल्या पाहिजेत असे म्हणणारे अति हे एक विचारवंत आहेत.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# रवींद्र चव्हाणांनी उमेदवारांविरोधात रसद पुरवल्याचा आरोप, मेहुण्याच्या भूमिकेने चर्चा



**सिंधुदुर्ग :** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपला घवघवीत यश मिळालं. कोकणातही राणेंच्या नेतृत्वात भाजपने विजय खेचून आणला. मात्र सिंधुदुर्ग जिल्ह्यात अपक्षांच्या विजयाने सर्वांचंच लक्ष वेधून घेतलं असून यातून भाजपमधील अंतर्गत वादही उफाळून आला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे महायुतीत मिठाचा खडा टाकत असल्याचा हल्लाबोल नगरपरिषद आणि नगरपालिका निवडणुकांवेळी शिवसेनेचे आमदार नीलेश राणे यांनी केला होता. त्यानंतर आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीतही रवींद्र चव्हाण यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. रवींद्र चव्हाण यांनी मेहुणे विनोद राऊळ यांच्या माध्यमातून सिंधुदुर्ग जिल्ह्यात भाजपच्या उमेदवारांविरोधातच अपक्षांना बळ देत निवडून आणल्याचा आरोप भाजपमधील एका गटाकडून केला जाऊ लागला आहे.तळकोकणात दोन महिन्यांपूर्वी झालेल्या नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीत भाजपचा बोलबाला राहिला होता. राणेंच्या नेतृत्वाखाली महायुतीला विजय मिळाला. नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीतही भाजपचे खासदार नारायण राणे , मंत्री नितेश राणे व आमदार नीलेश राणे यांचा करिष्मा पाहायला मिळाला. पण या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात अपक्ष उमेदवार निवडून आल्याने राणेंच्या वर्चस्वाला काही प्रमाणात धक्का बसल्याची चर्चा सुरू आहे. सावंतवाडी तालुक्यात जिल्हा परिषद गटात काही अपक्ष निवडून आल्याने मंत्री नितेश राणे यांनी जाहीर नाराजी व्यक्त करत खडेबोल सुनावले. या अपक्षांच्या विजयामागे अदृश्य शक्तीचा हात असून छातीवर कमळ लावून काही नेते कमळ चिन्हाच्याच उमेदवारांना पाडण्यासाठी ताकद लावतात, अशा शब्दांत मंत्री नितेश राणे यांनी निकालाच्या दिवशीच आपली नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर आता राणेसमर्थक उमेदवारांनीही थेट नाव घेत आरोप केले आहेत.

या निवडणुकीत भाजपाचे जिल्हा सरचिटणीस महेश सारंग यांचा पराभव करून सावंतवाडी तालुक्यात कोलगाव जिल्हा परिषद गटातून मायकेल डिसूजा हे अपक्ष म्हणून निवडून आले. या विजयाचे श्रेय आमचे मार्गदर्शक रवींद्र चव्हाण यांना देणार, अशी प्रतिक्रिया मायकेल डिसूझा यांनी विजयानंतर दिल्याने आश्चर्य व्यक्त झाले. इतकंच नाही तर रवींद्र चव्हाण यांचे मेहुणे विनोद राऊळ यांनी विजयाच्या घोषणा दिल्याचे व्हिडिओ व्हायरल झाले आहेत. तर मायकेल डिसूजा यांच्या विजयानंतरच्या बॅनरवर रवींद्र चव्हाण यांचे फोटो झळकल्याने उलट सुलट राजकीय चर्चा रंगली होती. मात्र हे बॅनर आता काढण्यात आले आहेत. हे बॅनर आपण नाही तर आपल्या कार्यकर्त्यांनी लावले होते, असं स्पष्टीकरण मायकल डिसूजा यांनी दिलं आहे. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यात सध्या अपक्ष उमेदवारांना अदृश्य शक्तीच्या हातांनी पुरवलेली रसद, याची चर्चा रंगली आहे.दुसरीकडे, सावंतवाडी माडखोल गटातून सुप्रिया रविंद्र मडगावकर या भाजपच्या चिन्हावर उभ्या होत्या. सुप्रिया यांना भाजपकडून अधिकृत उमेदवारी मिळाली होती. मात्र असं असताना रवींद्र चव्हाण यांचे मेहुणे विनोद राऊळ यांनी अपक्ष उमेदवार उभे करून करून पक्षाच्या विरोधात उमेदवार निवडून आणले, असा खळबळजनक आरोप सुप्रिया मडगावकर यांचे पती आणि सावंतवाडीच्या पंचायत समितीचे माजी सभापती रविद्र मडगावकर यांनी केला आहे. '२०१९ मध्येच आम्ही राणेसाहेबांबरोबर भाजपामध्ये प्रवेश केला. त्यानंतर पक्षवाढीसाठी सातत्याने काम केलं.

## दादांच्या निधनानंतर शिंदेंनी अशी विधानं करु नयेत! तटकरेंनी शब्द न शब्द वाचला


**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलिनीकरणाचा विषय अधांतरीच राहिला आहे. यासंदर्भात शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी एक विशेष लेख लिहिला आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यावर दादांच्याच नेतृत्त्वात काम करणार होतो, असा उल्लेख त्यात आहे. यासंदर्भात अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनीत तटकरे यांनी त्यांच्या पक्षाची भूमिका स्पष्ट केली.दोन्ही राष्ट्रवादी एकत्र याव्यात ही अजित पवारांची इच्छा होती, असा आशयाचा लेख शशिकांत शिंदे यांनी लिहिला आहे. तो लेख मी वाचला. याबद्दलचा निर्णय आमच्या नेत्या सुनेत्रा पवार, पक्षाचे वरिष्ठ नेते घेतील. सुनेत्रा पवार आमच्या पक्षाच्या विधिमंडळातील नेत्या आहेत. त्याच उपमुख्यमंत्री आहेत. त्यामुळे वरिष्ठांसह चर्चा करुन त्या याबद्दलचा निर्णय घेतील. ज्यावेळी एखादा पक्ष आघाडीत येत असतो, त्यावेळी त्या आघाडीचं नेतृत्त्व करत असलेल्या मुख्य पक्षालादेखील विश्वासात घ्यावं लागतं. आम्ही आता एनडीएमध्ये आहोत आणि एनडीएमधील प्रमुख पक्ष भाजप आहे, असं तटकरे म्हणाले.शशिकांत शिंदे यांचा लेख मी वाचला. त्यातील एका वाक्यावर मला आक्षेप असल्याचं तटकरेंनी सांगितलं. 'अदृश्य शक्तींच्या कारवाया, धमक्या, खोटेनाटे षडयंत्र रचून केलेल्या आरोपांमुळे अजितदादा राष्ट्रवादीतून बाहेर पडले. त्यांना वेगळा गट स्थापन करावा लागला. त्याची आपल्याला कल्पना आणि जाणीव आहे. परंतु झालेली चूक आता पुन्हा दुरुस्त करायची या विचारानं दादा मागील चार-पाच महिन्यांपासून कामाला लागले होते,' असं शिंदे यांनी लेखात नमूद केलं आहे.

## परमबीरसिंग यांच्यावर अनिल देशमुखांची टीका

**मुंबई :** ज्या परमबीरसिंग यांनी मी गृहमंत्री असताना माझ्यावर खोटे आरोप करून मला बदनाम करण्याचे षडयंत्र रचले होते, त्याच सिंग यांचे भ्रष्टाचारी कारनामे आता एकामागून एक समोर येत आहेत. त्यांच्या पापाचा घडा आता भरला आहे,' अशी टीका माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी शुक्रवारी केली.लीलावती रुग्णालयातील विश्वस्त, डॉक्टरांनी परमबीरसिंग याच्यावर गंभीर आरोप केले आहेत. सिंग यांनी रुग्णालयातील डॉक्टरांकडून बढतीसाठी प्रत्येकी २५ लाख रुपयांची लाच वसूल करण्याचा उद्योग सुरू केला होता. या घोटाळ्यांमुळे आणि गैरवर्तनामुळे रुग्णालय प्रशासनाने त्यांना पदावरून काढून टाकले आहे. मी गृहमंत्री असताना उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या 'अँटिलिया' या निवासस्थानाबाहेर स्फोटके आढळल्यानंतर तत्कालीन पोलिस आयुक्त परमबीरसिंग या प्रकरणात सरकारची दिशाभूल करत होते, असे देशमुख यांनी सांगितले.

## पीएमओचंनाव 'सेवा तीर्थ' का ठेवलं? पंतप्रधान मोदींनी सांगितलं कारण

**दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज त्यांच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन केले. यावेळी त्यांनी आपल्या कार्यालयाचे नाव 'सेवा तीर्थ' का ठेवले, याचे कारण सांगितले. मोदी म्हणाले की, 'दुसऱ्यांची सेवा करणे हाच आपला सर्वात मोठा धर्म आहे आणि हीच भारताची खरी ओळख आहे. आजचा हा दिवस केवळ एका नवीन इमारतीच्या उद्घाटनाचा नाही, तर हा दिवस भारताच्या संकल्पशक्तीचा आणि गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्त होण्याच्या आपल्या प्रवासाचा एक महत्त्वाचा टप्पा आहे', असं यावेळी मोदी म्हणाले आहेत.अनेकांना प्रश्न पडला असेल की, पंतप्रधान कार्यालयाचे नाव 'सेवा तीर्थ' का ठेवण्यात आले? आपल्या संस्कृतीत म्हटले आहे, 'सेवा परमो धर्मः'. सेवा हीच आमची ओळख आहे आणि हाच भारताचा आत्मा आहे. आजवर आपण



ब्रिटीश साम्राज्याचा वारसा सांगणाऱ्या इमारतींमध्ये बसून धोरणे आखली. साउथ ब्लॉक आणि नॉर्थ ब्लॉक या इमारती भारताला गुलामगिरीच्या साखळदंडात जखडून ठेवण्यासाठी बांधल्या गेल्या होत्या. पण आज, हे 'सेवा तीर्थ' आणि ' कर्तव्य भवन ' १४० कोटी भारतीयांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी, त्यांच्या सेवेसाठी समर्पित आहे', असं पंतपधान मोदींनी यावेळी स्पष्ट केलं.पुढे बोलताना मोदी म्हणाले की, '२०१४ मध्ये देशाने एक मोठा संकल्प केला होता.

## अजितदादांची जागा भरून काढणार, १५ वर्षांची परंपरा कायम ठेवणार; सुनेत्रा पवारांचा कार्यकर्त्यांसाठी खास निर्णय

**पुणे :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार हे वर्षानुवर्षे दर शुक्रवारी पुण्यातील सर्किट हाउस येथे सकाळी सहा वाजल्यापासूनच कार्यकर्त्यांच्या भेटीगाठींसाठी उपस्थित असत. त्यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार या पहिल्यांदाच कार्यकर्त्यांना भेटण्यास पुण्यात उपस्थित राहणार असून, त्यासाठी 'दादां'नी घालून दिलेला शिरस्ताही त्या पाळणार असल्याचे दिसते आहे. नवनियुक्त उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या शुक्रवारी 'व्हीआयपी सर्किट हाउस' येथे कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी उपस्थित राहणार आहेतअजितदादा हे जवळपास १५ वर्षे पुण्याचे पालकमंत्री होते. या काळात दर शुक्रवारी ते पुण्यात कार्यकर्त्यांना भेटत. त्यानंतर शनिवारी ते बारामतीला मतदारसंघात जात असत. सुनेत्रा पवार पुण्यात आल्यानंतर जिल्हा



परिषद, पंचायत समितीमध्ये निवडून आलेले बहुतांश सदस्य त्यांना भेटण्यासाठी येणार आहेत. पुणे, मुंबई, बीड किंवा बारामतीला कोणत्याही विभागाची बैठक असो. त्या बैठकीला दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार येणार म्हटल्यावर कर्मचारी, अधिकाऱ्यांपासून सचिवांपर्यंत विविध प्रकारची माहिती घेऊन सज्ज, तर विविध मागण्यांचे निवेदने घेऊन आमदार, खासदार लोकप्रतिनिधी बैठकीला जातीने हजर राहत. त्याशिवाय कार्यकर्त्यांची गर्दी ही वेगळीच. मात्र, अनेक मॅरेथॉन बैठका घेणाऱ्या अजितदादांच्या अनुपस्थितीत जिल्हा नियोजन समितीची बैठक गुरुवारी पुण्यात झाली. एखाद्या अधिकाऱ्याकडून चुकीचे काम झाल्याची तक्रार येताच त्यांना तंबी देणारे, चांगल्या कामाचे कौतुक करणारे आणि मिश्कीलपणे हसत-खेळत चर्चा पुढे नेणाऱ्या अजितदादांची उणीव लोकप्रतिनिधींपासून ते अधिकारी, कर्मचाऱ्यांना चांगलीच जाणवली. दरम्यान, 'कोल्हापूर जिल्ह्यात अजित पवार यांच्या संकल्पनेतून उभारण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट स्टेडियमकरिता जमीन देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यांच्या उपस्थितीत विधानभवन येथील झुंबर सभागृहात विविध बैठकाही आयोजित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे कोल्हापूरमधील क्रिकेट स्टेडियम आणि झुंबर सभागृहाला अजित पवार यांचे नाव द्यावे,' अशी मागणी नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी केली.उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, 'दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार हे आपल्या कार्यपद्धतील सुक्ष्म अभ्यासातून भविष्याचा वेध घेण्याचा आग्रह करणारे व्यक्तिमत्त्व होते. राज्याच्या प्रगतीत त्यांचे फार मोठे योगदान होते. पुणे जिल्हा नियोजन समितीची बैठक खऱ्याअर्थाने वेळेत सुरू करून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

# पतीचा नंबर ब्लॉकलिस्टमध्ये; बायकोला वाढदिवसाचा मेसेज केला, नवऱ्याने टायगर पॉइंटवर आयुष्य संपवल

**पुणे (लोणावळा) :** लोणावळा येथे पती-पत्नीतील वाद किती टोकाला जाऊ शकतो याचे हृदयद्रावक उदाहरण समोर आलं आहे. पत्नीने रागाच्या भरात पतीचा मोबाईल नंबर ब्लॉक केल्यानंतर नैराश्यात गेलेल्या पतीने २५० फूट खोल दरीत उडी घेत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मृत पतीचं नाव विरेंद्र सिन्हा (मूळ रहिवासी पश्चिम बंगाल) असं असून तो सध्या हिंजवडी येथे नोकरी करत होते. ते कंटेनर विक्री करणाऱ्या कंपनीत सेल्स विभागात कार्यरत होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून विरेंद्र आणि त्यांच्या पत्नीमध्ये वाद सुरू होते. ७ फेब्रुवारी शनिवारी रोजी दोघांमध्ये जोरदार भांडण झालं. त्यानंतर १० फेब्रुवारी मंगळवारी रोजी पत्नी हिंजवडीहून माहेरी





निघून गेली. काल गुरुवारी रोजी पत्नीचा वाढदिवस होता. मध्यरात्रीपासून विरेंद्र पत्नीला फोन करत होते; मात्र, तिने नंबर ब्लॉक केल्यामुळे संपर्क होऊ शकला नाही. पहाटे ५ ते ६च्या सुमारास त्याने पत्नीला टेक्स्ट मेसेज आणि व्हिडिओ मेल पाठवून आत्महत्या करत असल्याचं कळवलं.

पत्नीने मेसेज पाहून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. विरेंद्र सिन्हा यांनी टायगर पॉइंट येथून सुमारे २०० ते २५० फूट खोल दरीत उडी घेतली होती. अथक प्रयत्नानंतर विरेंद्र सिन्हा यांचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. स्थानिक बचाव पथक शिवदुर्ग लोणावळा मित्र यांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढण्यात आला. याप्रकरणी लोणावळा ग्रामीण पोलीस अधिक तपास करत आहेत.

विरेंद्र यांचा विवाह तीन वर्षांपूर्वी झाला होता. पत्नीच्या वाढदिवशीच पतीने आत्महत्या केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. गेल्या आठवड्यातही याच परिसरात एका उच्चशिक्षित तरुणीने आत्महत्या केली होती. त्यामुळे टायगर पॉइंट आणि लायन्स पॉइंट अशा धोकादायक ठिकाणी पोलिसांची गस्त वाढवणे आणि स्थानिक नागरिकांनी सतर्क राहणे आवश्यक असल्याचे बोललं जात आहे.

निसर्गरम्य खंडाळा टेकडीवरील सनसेट पाहण्याचा आणि सेल्फी काढण्याचा मोह एका २६ वर्षीय तरुणाच्या जीवावर बेतल्याची दुर्दैवी घटना ८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी घडली. प्रज्वल वसंत गिरी (वय २६) हा सुमारे ७० ते ८० फूट खोल दरीत कोसळल्याने त्याचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्रज्वल गिरी हा आपल्या नातेवाईकांसह लोणावळा येथे फिरण्यासाठी आला होता. तेथील एका हॉटेलमध्ये त्यांचा मुक्काम होता.

हॉटेलमध्ये प्रवेशासाठी काही वेळ लागणार असल्याने सायंकाळी सहा ते साडेसहाच्या सुमारास सर्वजण खंडाळा टेकडीवर सनसेट पाहण्यासाठी गेले होते, तेव्हा ही दुर्दैवी घटना घडली.

## व्हॅलेंटाईन डे'च्या दोन दिवस आधी बिल्डरची मुलगी गायब, पोलिसांना संशय!

**छत्रपती संभाजीनगर :** 'व्हॅलेंटाईन डे' जवळ आलेला असतानाच छत्रपती संभाजीनगरमधून काळजाचा ठोका चुकवणारी एक घटना समोर आली आहे. 'मम्मी, मी घर सोडून कायमची चाललेय, लोकांना सांगून दे...', असा मेसेज आईला पाठवून एका तरुण मुलीने घराचा उंबरठा ओलांडला. प्रेमाच्या या आठवड्यात मुलीने अचानक घेतलेल्या या निर्णयामुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे.याप्रकरणी मिळालेली माहिती अशी की, ही मुलगी फुलंब्री शहरातील एका प्रतिष्ठित आणि सधन कुटुंबातील आहे. तिचे वडील व्यवसायाने बिल्डर असून कुटुंबात सुबत्ता आहे. घरात कोणत्याही गोष्टीची उणीव नसताना आणि अत्यंत लाडात वाढलेल्या या मुलीने अचानक असं पाऊल का उचललं, याचं गूढ कायम आहे. नेहमीप्रमाणे घरात सर्व काही सुरळीत असताना अचानक आलेल्या या मेसेजमुळे एका सुखी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.१४ फेब्रुवारीच्या पार्श्वभूमीवर सगळीकडे उत्साहाचे वातावरण असताना, या मुलीने अचानक घराबाहेर पडण्याचा निर्णय घेतला. तिने आपल्या



आईच्या मोबाईलवर आपण घर सोडून जात असल्याचे कळवले आणि त्यानंतर तिचा फोन तातडीने 'स्विच ऑफ' झाला. आई-वडिलांनी वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी हताश होऊन पोलिसांत धाव घेतली.व्हॅलेंटाईन वीक सुरू असल्याने ही मुलगी एखाद्या प्रेमप्रकरणातून किंवा कोणाच्या तरी सांगण्यावरून घर सोडून गेली असावी, असा प्राथमिक संशय व्यक्त केला जात आहे. बिल्डर पित्याच्या तक्रारीवरून पोलिसांनी तपास सुरू केला असून मुलीच्या सोशल मिडिया चॅट्सची आणि कॉल डिटेल्सची बारकाईने तपासणी केली जात आहे. पोलीस शहरातील सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने तिचा माग काढण्याचा प्रयत्न करत आहेत.

## १० वीतील मुलाला बोलावून शारीरिक संबंध

**मुंबई :** लहान मुलांशी संबंधित अत्याचाराच्या घटना वाढत असतानाच मुंबई शहरातील पूर्व उपनगरात धक्कादायक घटना समोर आली आहे. एका १६ वर्षांच्या अल्पवयीन मुलाने केलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी १९ वर्षीय तरुणीविरुद्ध लहान मुलांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण (पोक्सो) कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या तरुणीने धमकावत जबरदस्ती केल्याचा आरोप अल्पवयीन मुलाने केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबई पूर्वी उपनगरातील आरोपी १९ वर्षीय तरुणीने पहिल्यांदा २३ ऑगस्ट २०२४ रोजी घरात एकटी असल्याचे कारण देत पीडित अल्पवयीन मुलाला बोलावून घेतलं.

यावेळी तिने आधी मुलाला तिच्यासोबत बोलण्यात गुंतवण्याचा प्रयत्न केला. मात्र तो ऐकत नसल्याचं पाहून तरुणीने जबरदस्तीने त्याच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप मुलाने तक्रारीत केला आहे.या पहिल्या भेटीचा हवाला देत धमकावत आरोपी तरुणीने नंतरही अनेकदा पीडित मुलाला आपल्या जाळ्यात ओढलं.

## अल्पवयीन विद्यार्थिनीला रस्त्यात अडवलं, धमकावून सामूहिक अत्याचार

**अमरावती :** अमरावती जिल्ह्यातील चांदूर तालुक्यात संतापजनक घटना उघडकीस आली आहे. शाळेतून घरी परतणाऱ्या १६ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीला बदनामीची धमकी देत पाच नराधमांनी तब्बल सात महिन्यांच्या कालावधीत वारंवार सामूहिक अत्याचार केल्याचं उघडकीस आलं आहे. या अमानुष कृत्यामुळे पीडित मुलगी तीन महिन्यांची गर्भवती राहिली आहे. याप्रकरणी चांदूर रेल्वे पोलिसांनी ९ फेब्रुवारी रोजी रात्री उशिरा पाचही आरोपींविरुद्ध पॉक्सो कायदा तसेच ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.प्राथमिक तपासानुसार, पीडित मुलगी शाळेतून घरी जात असताना साईनाथ (वय १८) आणि अजिंक्य (वय १८) यांनी तिला अडवून 'तुझे मुलांसोबत लफडे आहेत, आम्ही तुझी बदनामी करू,' अशी धमकी दिली. त्यानंतर नराधमांनी भीतीने घाबरलेल्या मुलीला त्यांनी विरूळ रोंघे मार्गावरील निर्जन ठिकाणी नेऊन पहिला अत्याचार केला. त्यानंतर कार्तिक गजानन शेलोकार, साहील (वय १८) आणि संकेत विनोद काळे (वय २) यांनी वेगवेगळ्या वेळी तिच्यावर अत्याचार केला.हा अत्याचार ७ जुलै २०२५ ते ६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत सुरू होता. आरोपींनी सतत धमकावल्यामुळे पीडिता तक्रार करण्यास घाबरत होती. अखेर प्रकृती बिघडल्यानंतर वैद्यकीय तपासणीत ती तीन महिन्यांची गर्भवती असल्याचं निष्पन्न झालं, त्यानंतर हा प्रकार समोर आला. पोलिसांनी तत्परता दाखवत ९ फेब्रुवारी रोजी रात्री १०:५१ वाजता कार्तिक गजानन शेलोकार (वय २१) आणि संकेत विनोद काळे (वय २२) या दोघांना अटक केली आहे. उर्वरित आरोपी साईनाथ, अजिंक्य आणि साहील असून पोलीस त्यांचा कसून शोध घेतला असून, ते तीन आरोपी सुद्धा अटकेत आहेत. पोलीस उपनिरीक्षक वीणा पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. आरोपींवर बलात्कार, सामूहिक अत्याचार, पॉक्सो व ॲट्रॉसिटी अंतर्गत गंभीर कलमे लावण्यात आली आहेत. आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, यासाठी पोलीस जलदगतीने पुरावे गोळा करत आहेत.गोवंडी परिसरात १९ वर्षांच्या शिफा शेख हत्याकांडाने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.

# मित्राची ओढ आईची नजर चुकवून नाशकातील तीन अल्पवयीन मैत्रिणी भेटीला

**नाशिक :** मित्राच्या अनामिक ओढीने आईची नजर चुकवून तीन अल्पवयीन मैत्रिणी घरातून गेल्या खऱ्या. मात्र, घरी परतण्यास उशीर झाल्याने घरचे रागावतील या भीतीने त्यांनी घरी जाण्याचे टाळले आणि संपूर्ण रात्र तिघींनी पेरूच्या बागेत काढली. ही घटना आहे नाशिकमधील. विशेष म्हणजे अत्यंत सामसूम, निर्जन परिसर असलेल्या पेरूच्या बागेतील दाट झाडीत आणि रात्रीच्या किर्र अंधारात या तिघीही मैत्रिणी रात्रभर थांबून राहिल्याचे वास्तव त्यांच्याच तोंडून समजताच त्यांचा शोध घेणारे पोलिस पथक आणि त्यांचे कुटुंबीयही अवाकच झाले. घरचे रागावतील या भीतीने संपूर्ण रात्र घरापासून दूर दाट झाडीत आणि किर्र अंधारात घालविणाऱ्या या तिघी मैत्रिणींत



दोन जणी सख्ख्या बहिणी आहेत. दोन्ही बहिणी दहावीतील आपल्या मैत्रिणीच्या घरी मंगळवारी दुपारी अडीचच्या सुमारास अभ्यासासाठी गेल्या होत्या. घरासमोरील शेतात तिघी अभ्यास करीत असताना मैत्रिणीची आईदेखील त्यांच्याजवळच बसून तिचे काम करीत होती. आई पाण्याचा हंडा भरून घेऊन घरात गेल्याची संधी बघून तिघीही मैत्रिणींनी दुपारी साडेतीनला मित्राला भेटण्यासाठी धूम ठोकली.थोड्या वेळाने आई घराबाहेर आल्यावर तिघीही जागेवर नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. सायंकाळपर्यंत त्या परत न आल्याने त्यांनी शोध घेण्यास सुरुवात केली. मुलीच्या मैत्रिणींच्या घरी चौकशी केली. त्या तिथेही नव्हत्या. दिवसभर त्या कुठेच न आढळल्याने अखेर मुलीच्या कुटुंबीयांनी जवळचे पोलिस ठाणे गाठून तीन मुली बेपत्ता झाल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र सपकाळे यांना दिली.घटनेचे गांभीर्य ओळखून वरिष्ठ पोलिस निरीक्षकाच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तिघीही मुलींच्या पालकांना सोबत घेऊन त्यांचा परिसरात शोध घेतला. त्या न आढळल्याने तिघींपैकी एकीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून बुधवारी पहाटे चारला अखेर तिन्ही मुली बेपत्ता झाल्याचा गुन्हा पोलिस ठाण्यात दाखल झाला. त्यानंतर पोलिसांनी पुन्हा मुलींचे सर्च ऑपरेशन सुरू केले. संपूर्ण रात्र पोलिसांनी हे सर्च ऑपरेशन सुरू ठेवलेअखेरीस या तिन्ही मुली बुधवारी घाबरलेल्या स्थितीत आढळल्या. त्यांना ताब्यात घेऊन तिघींनाही पोलिस ठाण्यात त्यांच्या पालकांच्या स्वाधीन केले. या तिघी अल्पवयीन मुलींच्या शोधासाठी पोलिसांनी दहा तास सर्च ऑपरेशन राबवले.घरी येण्यासाठी उशीर झाल्याने घरचे रागावतील या भीतीने आपण घरी न येता पेरूच्या बागेतच थांबून राहिल्याची माहिती तिन्ही मुलींनी पोलिसांना दिली. किर्र अंधारात मुलींनी रात्रभर ठिय्या दिल्याची बाब समजल्यावर सर्वांनाच आश्चर्य वाटले. आजूबाजूला कोणीही नसताना तिघींनी एकमेकींना धीर देत रात्र काढली.

# बलाढ्य ऑस्ट्रेलियाचा पराभव, पॉइंट टेबलचं गणित बदललं, झिम्बाब्वेचा शानदार विजय

**मुंबई/वृत्तसंस्था :** टी-२० वर्ल्ड कप २०२६ मध्ये सर्वात मोठा उलटफफेर पाहायला मिळाला आहे. बलाढ्य ऑस्ट्रेलिया संघाचा झिम्बाब्वेने २३ धावांनी पराभव केला आहे. ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करताना २० ओव्हरमध्ये १६९-२ धावा केल्या होत्या. झिम्बाब्वेच्या १७० धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा संघ १९.३ ओव्हरमध्ये १४६ वर ऑल आऊट झाला. या विजयामुळे आता झिम्बाब्वेच्या सुपर८ मधील आशा वाढल्या आहेत. तर ऑस्ट्रेलियासाठी आता अस्तित्त्वाची लढाई राहिली आहे. या पराभवामुळे पॉइंट टेबलमध्येही उलटफफेर झाला आहे. २००७ च्या वर्ल्ड कपमध्येही ऑस्ट्रेलियाला



झिम्बाब्वेच्या संघाने पराभूत केले होते. झिम्बाब्वे संघाकडून ब्रायन बेनेटने नाबाद ६४ धावा, तदिवानाशे मारुमणी ३५ धावा आणि डायन मायर्सनेही ३५ धावा केल्या. तर सिकंदर रझाही २५ धावांवर नाबाद राहिला.ऑस्ट्रेलिया संघाकडून स्टॉयनिस आणि ग्रीन यांना एक बळी मिळवत आला.

ऑस्ट्रेलिया संघाकडून रेनशॉने ६५ धावांची खेळी केली मात्र त्याला इतर कोणाची साथ मिळाली नाही, मॅक्सवेलने ३१ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाच्या आठ खेळाडूंनास दुहेरी धावसंख्या गाठता आली नाही. मुजरबानीने ४ विकेट आणि ब्रॅड इव्हान्सनने ३ विकेट घेत कांगारूंना बॅकफ्रूटवर ढकललं.झिम्बाब्वे संघाच्या विजयामुळे त्यांनी ग्रुप बी मध्ये थेट दुसऱ्या स्थानी झेप घेतली आहे. या ग्रुपमध्ये श्रीलंका संघ दोन विजयांसह अग्रस्थानावर आहे. आता झिम्बाब्वे संघ सुपर८ चा दावेदार ठरला आहे. झिम्बाब्वे ४ गुणांसह दुसऱ्या स्थानावर गेली आहे. तर ऑस्ट्रेलिया एका विजयासह तिसऱ्या स्थानी आहे. ऑस्ट्रेलियाला आता पुढील दोन्ही सामन्यात मोठा विजय साकारावा लागणार आहे.

दरम्यान, श्रीलंका आणि ओमान यांच्यासोबत पुढील सामने असणार आहेत. फक्त विजय मिळवून चालणार नाही तर रन रेटसाठ मोठ्या विजयाची आवश्यकता आहे. तर दुसरीकडे झिम्बाब्वेसाठी मोठी संधी चालून आली आहे. त्यांचे सामने ओमान आणि आयर्लंड या संघासोबत असणार आहे. त्यामुळे त्यांना सुपर८ मध्ये विजय मिळवण्याचा मार्ग खडतर नसणार आहे.

## टीमच्या पहिल्या विजयात पठ्ठ्याची कोरीव कामगिरी

**मुंबई/वृत्तसंस्था :** वर्ल्ड कप टी-२० क्रिकेट स्पर्धेतील आपल्या दुसऱ्याच सामन्यात विजय मिळवत इटली संघाने मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवरील जवळपास सव्वातेरा हजार नेपाळी चाहत्यांना शांत केले. अँथनी आणि जस्टीन हे मोस्का बंधू आणि पिझ्झाविक्रेता म्हणून काम करणारा क्रिशन कालुगामागे याच्या प्रभावी फिरकी गोलंदाजीमुळे स्पर्धेच्या गट साखळी लढतीत इटलीने नेपाळवर १० विकेट आणि ४४ चेंडू राखून सहज मात केलीइटलीत नोकरीसाठी संघर्ष करणारा क्रिशन कालुगामागे या मूळच्या श्रीलंकन गोलंदाजाने आपल्या लेगब्रेक गुगलीने तीन मोहरे टिपले. १२४ धावांचे आव्हान जस्टीन आणि अँथनी या मोस्का बंधुंनी १२.४ घटकांत पार करत इटलीचा विजय साकारला. अँथनीने विजयी धाव पूर्ण होताच विजयाचे सेलिब्रेशन करत नाचायला सुरुवात केली. उपस्थित १३,४०६ चाहत्यांत बोटावर मोजण्या



इतके इटलीचे समर्थक होते. सचिन तेंडुलकर स्टँडमधील या समर्थकांचे इटली संघाने विजयानंतर आभार मानले. नेपाळ मात्र निष्प्रभ ठरला. नेपाळने ३ षटकार आणि ७ चौकारच लगावले, त्याचवेळी इटलीच्या सलामीवीरांनी ९ षटकार आणि ८चौकारांची आतषबाजी केली. पॉवरप्लेमध्ये नेपाळ १ बाद ४५ अशी सुरुवात करीत असताना इटलीने ६८ धावांचा चोप दिला होता. इटलीचे अर्धशतक २४ चेंडूत तर शतक ६५ चेंडूंत झळकले.मुंबईचे स्टेडियम, वातावरण आम्ही जाणतो. प्रेक्षकांचाही पाठिंबा आम्हाला असेल.

## पाकड्यांनो तयारीत राहा, हार्दिक येतोय पराभवाचा धक्का देण्यासाठी, पाकिस्तानाला चार शब्दात दिली वॉर्निंग

**दिल्ली/वृत्तसंस्था :** टीम इंडियाने टी-२० विश्वचषक इतिहासातील सर्वात मोठा विजय नोंदवला. दिल्लीमध्ये नामिबियाविरुद्ध ९३ भारताने विजय मिळवला. नामिबियाने नाणेफेक जिंकली आणि प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना भारताने २०९ धावा केल्या. या उलट नामिबियाला फक्त ११६ धावा करता आल्या. आता भारताचा पुढील सामना हा पाकिस्तानविरुद्ध असणार आहे. या सामन्यावर हार्दिक पांड्या काय म्हणाला ते पाहा...

हार्दिक पंड्याने बॅटने ५२ धावा केल्या आणि चेंडूने दोन विकेट घेतल्या. त्याच्या प्रभावी अष्टपैलू कामगिरीमुळे त्याला सामनावीराचा पुरस्कार मिळाला. सामन्यानंतर, त्याने पाकिस्तानविरुद्धच्या मोठ्या सामन्यापूर्वी त्याच्या फिटनेसचे रहस्य सांगितले. त्याने स्पष्ट केले की, 'तो लष्करी जवानासारखा सराव करतो, म्हणूनच तो सर्वोत्तम फॉर्ममध्ये आहे.'हार्दिक पंड्याने नामिबियाविरुद्ध २८ चेंडूत ५२ धावा केल्या, त्यात चार चौकार आणि चार षटकार मारले. त्याने त्याच्या चार षटकांच्या स्पेलमध्ये २१ धावा देऊन दोन विकेटही घेतल्या. त्याच्या फिटनेसबद्दल विचारले असता, हार्दिकने सामन्यानंतर सांगितले, 'त्यासाठी खूप अतिरिक्त प्रयत्न करावे लागतात आणि मी ते करण्यास मागेपुढे पाहत नाही. मी सकाळी आणि संध्याकाळी दोन सत्रात लष्करी जवानासारखा सराव करतो. जेव्हा जेव्हा



माझ्याकडे मोठी स्पर्धा किंवा मालिका असते तेव्हा मी एक महिना आधीच स्वतःची तयारी सुरू करतो. मी माझ्या दिनचर्येचा आढावा घेतो, मला चांगली झोप मिळते याची खात्री करतो आणि योग्य सवयी राखतो. यामुळे मला उत्तम लय मिळवण्यास मदत होते आणि खेळादरम्यान माझे शरीर मला पूर्णपणे साथ देते.'नामिबियाविरुद्धच्या सामन्यात, इशान किशन (६१) आणि हार्दिक पंड्या (५२) यांनी शानदार खेळी केल्या, ज्यामुळे भारताने २०९ धावांचा मोठा आकडा गाठला. नामिबियाचा संघ ११६ धावांवर गारद झाला. भारताकडून वरुण चक्रवर्तीने तीन, तर अक्षर पटेल आणि हार्दिक पंड्या यांनी प्रत्येकी दोन विकेट घेतल्या. सलग दोन विजयांनंतर, भारतीय संघ आता १५ फेब्रुवारी रोजी पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यासाठी सज्ज आहे.

## पाकिस्तानविरुद्ध सामन्याआधी भारताची चिंता वाढली, सलामीवीर अभिषेक पडक्या चेहऱ्याने म्हणाला, दोन किलो घटले

**मुंबई/वृत्तसंस्था :** टी२० विश्वचषकात रविवारी होऊ घातलेल्या पाकिस्तान विरुद्धच्या हायव्होल्टेज सामन्याआधी टीम इंडियाची चिंता वाढली आहे. भारतीय क्रिकेट संघाचा सलामीवीर अभिषेक शर्मा याला रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाला असला, तरी तो तंदुरुस्त होईल का, याविषयी अनिश्चितता कायम आहे. संघातील सहकारी अर्शदीप सिंह याच्या व्लॉगमध्ये अभिषेक शर्माचं दर्शन घडलं आणि चाहत्यांच्या काळजाचा ठोका चुकला.पोटाच्या संसर्गामुळे अभिषेक शर्माला वर्ल्डकपमधील सुरुवातीच्या दोन सामन्यांना मुकावं लागलं होतं.

गुरुवारी झालेल्या नामिबियाविरुद्धच्या सामन्यात इशान किशन आणि संजू सॅमसन यांनी सलामीला रचलेल्या धावसंख्येच्या बळावर भारताने नामिबियाला ९३ धावांनी नमवलं, मात्र लढता-लढता तळाच्या फलंदाजांचा कस लागला.अभिषेक शर्मा शंभर




टक्के फिट होऊन मैदानात उतरणं कठीण असल्याचं अर्शदीपने सोशल मीडियावर शेअर केलेल्या व्हिडिओत दिसत आहे. अर्शदीपने अभिषेकला त्याची प्रकृती, घटलेलं वजन आणि डाएट याविषयी विचारलं. रविवारी पाकिस्तानविरुद्ध होणाऱ्या सुपर-सामन्याआधी तंदुरुस्त होण्याचा अभिषेकचा मानस आहे, मात्र प्रकृती त्याला साथ देणार का, हे पाहणं महत्त्वाचं आहे.फक्त डाळ आणि भात अशा सक्तीचा पथ्याचा आहार घ्यावा लागत आहे, याकडे अभिषेकने व्हिडिओत लक्ष वेधलं. पोटाशी निगडित संसर्गामुळे रुग्णालयात दाखल झाल्यानंतर आपलं किमान दोन किलो वजन कमी झाल्याचंही त्याने सांगितलं.

या पार्श्वभूमीवर त्याच्या पुनरागमनावर अनिश्चिततेचे ढग दाटले आहेत.अमेरिकेविरुद्धच्या सामन्यापूर्वी अभिषेक शर्मा आजारी पडला होता. तीव्र गॅस्ट्रोएन्टेरिटिस आणि डिहायड्रेशनवर उपचार घेण्यासाठी त्याला नवी दिल्लीतील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.अभिषेकला डिस्चार्ज देण्यात आल्यानंतर शुक्रवारी तो हलका सराव करत असल्याचे दिसून आले. मात्र संघ व्यवस्थापन सावध भूमिकेत आहे. कर्णधार सूर्यकुमार यादवने अलिकडेच दिलेल्या माहितीनुसार अभिषेक अजूनही बरा नाही आणि एक-दोन सामन्यांना मुकावं लागू शकतं. त्यामुळे संघ या एकाच सामन्यासाठी त्याला परत आणण्यापेक्षा त्याच्या दीर्घकालीन तंदुरुस्तीला प्राधान्य देऊ शकतो.

वैद्यकीय पथकाची प्राथमिक चिंता ही अभिषेकची शारीरिक तयारी आहे, कारण संसर्गामुळे त्याचे वजन लक्षणीयरीत्या कमी झाले आहे. त्याची सहनशक्तीही कमी झाली आहे.

त्याला पुन्हा सराव करताना पाहिल्यानंतर संघातील सहकारी वरुण चक्रवर्तीने आशावाद व्यक्त केला तरी, अंतिम निर्णय कोलंबोमधील अंतिम सामन्यापूर्वीच्या प्रशिक्षण सत्रातील त्याच्या कामगिरीवर अवलंबून असेल.अभिषेक फिटनेस सिद्ध करु शकला नाही, तर संजू सॅमसनला इशान किशनसोबत सलामीच्या संघात कायम ठेवले जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.


# कोटींचं कर्ज ९ कोटींवर; कोर्टात वकिलांचा वेगळाच दावा, अर्ध कर्ज फेडलंय.., खटल्यात नेमकं घडलंय तरी काय?



**मुंबई :** बॉलिवूडमधला लोकप्रिय विनोदी अभिनेता राजपाल यादव सध्या तिहार तुरुंगात आहे. सिनेमासाठी घेतलेलं कर्ज फेडू न शकल्यामुळं त्याच्यावर ही वेळ आली आहे. गेल्या काही वर्षापासून हे प्रकरण कोर्टात सुरू आहे. आता मात्र माझ्याकडे खरंच पैसे नाहीत, असं म्हणत राजपाल यादव यानं तुरुंगात आत्मसमर्पण केलं होतं. या सगळ्या प्रकरणात आता एक मोठी अपडेट समोर आली आहे. त्याच्या वकिलांनी महत्त्वाची माहिती दिल्याचं समोर आलंय.९ कोटी रुपयांच्या कर्ज परत फेडीच्या प्रकरणात राजपाल यादव यानं आतापर्यंत २.५ कोटी रुपये भरले असल्याची माहिती त्यांच्या वकिलांनी नुकतीच दिली आहे हे प्रकरण २०१० सालातील आहे, जेव्हा राजपाल यादवनं 'अता पता लापता' या चित्रपटाच्या निर्मितीसाठी दिल्लीतील एका व्यावसायिकाकडून ५ कोटी रुपयांचं कर्ज घेतलं होतं. व्याजासह ही रक्कम वाढून साधारण ९ कोटी रुपयांच्या घरात पोहोचली आहे. राजपालनं काही चेक्स दिले,पण ते बाऊन्स झाले. ही कर्जाची वेळेवर परतफेड न झाल्यामुळं संबंधित व्यावसायिकानं न्यायालयात धाव घेतली होती.राजपाल यादवच्या वकिलांनी न्यायालयात सांगितलंय की,अभिनेत्यानं आतापर्यंत एकूण २.५ कोटी रुपयांची परतफेड केली आहे. उर्वरित रक्कम भरण्यासाठी ते प्रयत्नशील असून, न्यायालयाच्या आदेशांचा सन्मान करत आहेत. राजपाल यादव यांचा हेतू कधीच कर्ज बुडवण्याचा नव्हता पण आर्थिक गणितं जुळवण्यास थोडा वेळ लागत असल्याचं त्यांनी कोर्टासमोर स्पष्ट केलं.याच प्रकरणामुळं राजपाल यादवला २०१८ मध्ये तीन महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षाही भोगावी लागली होती. चेक बाऊन्स आणि खोटी प्रतिज्ञापत्रे सादर केल्याच्या आरोपाखाली दिल्ली उच्च न्यायालयाने त्यांच्यावर कडक ताशेरे ओढले होते. तुरुंगात जाण्यापूर्वी राजपाल यादवनं 'माझ्याकडे सध्या पैसे नाहीत आणि कोणताही मित्र मदतीला नाही' असें भावनिक विधान केले होते. यानंतर त्याच्याबाजुनं एक सहानुभूतीची लाट असल्याचं पाहायला मिळालं. नेटकऱ्यांनी सोशल मीडियावर बॉलिवूड कलाकारांनी त्याला मदत करायला हवी, असं म्हटलं होतं. यानंतर अनेकांनी मदतीचा दात पुढं केला होता. यानंतर सोनू सूदनं राजपालसाठी सोशल मीडियावर पोस्ट केली. त्यानं केवळ आर्थिक मदतच केली नाही, तर राजपालला त्याच्या आगामी चित्रपटासाठी 'सायनिंग अमाउंट'देऊन त्याला सन्मानानं कामही दिलं. तर 'जेमट्यून्स म्युझिक'चे मालक राव इंद्रजीत सिंह यांनी १.११ कोटी रुपयांची मोठी आर्थिक मदत जाहीर केली आहे. शिवाय बिहारचे माजी मंत्री आणि 'जनशक्ती जनता दल'चे अध्यक्ष तेज प्रताप यादव यांनी राजपालच्या कुटुंबासाठी ११ लाख रुपयांची मदत देऊ केली आहे.गायक मिका सिंग, गुरु रंधावा, सलमान खान, अजय देवगण, वरुण धवन आणि चित्रपट निर्माते डेव्हिड धवन यांनी देखील राजपाल यांना वैयक्तिक स्तरावर पाठिंबा दर्शवला आहे.

## वादग्रस्त गाण्यावर गौतमी पाटीलचा डान्स

**मुंबई :** महाराष्ट्राची लाडकी आणि लोकप्रिय नृत्यांगना सबसे कातिल गौतमी पाटील पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे. आपल्या दमदार आणि ऊर्जा भरलेल्या सादरीकरणासाठी ओळखली जाणारी गौतमी पाटील यावेळी एका गाजलेल्या बॉलिवूड चित्रपटातील गाण्यावर ठेका धरताना दिसली आहे. गौतमी पाटीलने बॉलिवूडची धक-धक गर्ल अभिनेत्री माधुरी दीक्षित हिच्या लोकप्रिय गाण्यावर 'चोली के पीछे क्या है' यावर भन्नाट डान्स केला आहे. हे गाणे १९९३ साली प्रदर्शित झालेल्या खलनायक या चित्रपटातील असून तिच्या डान्स स्टेपमुळे सध्या ते प्रचंड चर्चेत आलं आहे. त्यासोबतच तिच्या डान्सने देखील सोशल मीडियावर धुमाकूळ घातला आहे. गौतमीने या गाण्यावर केलेल्या डान्समध्ये तिची खास शैली, आत्मविश्वास आणि मंचावरील पकड स्पष्ट दिसून येत आहे. या गाण्याच्या तालावर तिने सादर केलेल्या स्टेप्स आणि एक्सप्रेशन्स पाहून उपस्थित



प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. गौतमी पाटीलच्या या गाण्यावरील डान्सचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. इंस्टाग्राम, फेसबुक आणि यूट्यूबवर चाहत्यांकडून या व्हिडीओला हजारो लाईक्स आणि कमेंट्स मिळत आहेत. अनेकांनी तिच्या आत्मविश्वासाचे आणि धडाकेबाज डान्सचे कौतुक केले आहे.

काही चाहत्यांनी 'गौतमीने माधुरीच्या गाण्याला वेगळाच अंदाज दिला' अशी प्रतिक्रिया दिली आहे तर काहींनी तिच्या स्टेज प्रेझेन्सचे विशेष कौतुक केले आहे. गौतमी पाटीलचे नाव गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रात प्रचंड लोकप्रिय झाले आहे. तिच्या कार्यक्रमांना मोठी गर्दी होत असते. यावेळीही तिच्या या सादरीकरणाने चाहत्यांना भुरळ घातली आहे.वादग्रस्त ठरलेल्या आणि गाजलेल्या गाण्यावर सादरीकरण करून गौतमीने पुन्हा एकदा आपली वेगळी ओळख सिद्ध केली आहे. तिचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर ट्रेंड होत आहे. दरम्यान, गौतमी पाटीलने 'चोली के पीछे क्या है' या गाण्यावर केलेल्या डान्समुळे ती पुन्हा एकदा चर्चेत आली आहे.

## या चित्रपट इतके बोल्ड आणि इंटीमेट सीन की प्रेक्षकांना मोजता येईना

**मुंबई :** शाहिद कपूर आणि तृप्ती डिमरी यांचा बहुचर्चित चित्रपट 'ओ रोमियो' अखेर थिएटरमध्ये प्रदर्शित झाला आहे. रिलीज होताच या चित्रपटाची प्रेक्षकांमध्ये जोरदार चर्चा सुरु झाली आहे. सोशल मीडियावर या चित्रपटाबाबत विविध प्रतिक्रिया उमटताना दिसत आहेत. विशेषतः अ‍ॅक्शन, रोमान्स आणि इंटिमेट सीनमुळे हा चित्रपट चर्चेचा विषय ठरला आहेप्रेक्षकांच्या मते, या चित्रपटात दमदार अ‍ॅक्शन सीन्ससोबत शाहिद कपूर आणि तृप्ती डिमरी यांच्यातील रोमँटिक आणि इंटिमेट सीनही मोठ्या प्रमणात दाखवण्यात आले आहेत. काही प्रेक्षकांनी तर विनोदाने असे म्हटले की, चित्रपट पाहताना किसिंग सीन मोजणेच अशक्य झाले. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर एका युजरने लिहिले की, 'या चित्रपटात किती किसिंग सीन आणि किती वेळा शिवीगाळ वापरली गेली आहे हे मी मोजूच शकत नाही. कुणी पाहिलं असेल तर मला नक्की सांगा.'



## सनी लेओने च्या चाहत्यांना नाराज करणारी बातमी, रागिणी MMS ३ मधून पत्ता कट...

**मुंबई :** २०११ मध्ये रिलीज झालेल्या 'रागिनी चचड' या हॉरर ड्रामा सिनेमाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता. त्यानंतर सनी लिओनीची मुख्य भूमिका असलेला 'रागिनी चचड २' हा चित्रपट प्रदर्शित झाला. आता, या चित्रपटाचा तिसरा भाग लवकरच तयार करण्यात येणार असल्याचे बोलले जात आहे. पण यावेळी सिनेमात सनी लिओनीला पाहता येणार नाही कारण तिची जागा एका वेगळ्या अभिनेत्रीने घेतली आहे. यावेळी या बॉलिवूड सिनेमात एक नवीन जोडी पाहायला मिळेल.पिंकव्हिलाच्या वृत्तानुसार, 'रागिनी एमएमएस ३' साठी अनेक कलाकारांशी चर्चा सुरू आहे, ज्यात तमन्ना भाटिया आणि जुनैद खान यांच्या नावाचाही समावेश आहे. या दोघांची नावे नक्की झाली तर तमन्ना भाटिया आणि जुनैद पहिल्यांदाच पडद्यावर एकत्र दिसतील. ही आगळीवेगळी जोडी पाहण्यासाठी प्रेक्षकही उत्सुक आहेत. असे असले तरी रागिणी एमएमएसमुळे सनी लिओनीचा एक वेगळा फॅनबेस तयार झालेला. त्यामुळे या सिनेमात सनीची अनुपस्थिती नक्कीच चाहत्यांना खटकेल. पण याबाबत अद्याप कोणतीही पुष्टी झालेली नाही. रागिनी एमएमएस ३' हा चित्रपट शशांक घोष दिग्दर्शित करणार असल्याचे बोलले जात आहे, या सिनेमाच्या पहिल्या भागाचे म्हणजेच 'रागिनी एमएमएस' चे दिग्दर्शकही तेच होते. तथापि, अद्याप याबद्दल कोणतीही माहिती प्रसिद्ध झालेली नाही. साहिर रझा सुरुवातीला या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार होते, परंतु शेड्युलमधील अडचणींमुळे त्यांनी नकार दिला, ज्यामुळे विलंब झाला. ऐता शशांक घोष या चित्रपटाचे दिग्दर्शन करतील.२०११ च्या या फ्रँचायझी चित्रपटात राजकुमार राव आणि कैनाज मोतीवाला यांनी भूमिका केल्या होत्या. ही कथा दोन प्रेमींभोवती फिरते जे एकत्र एका फार्महाऊसमध्ये प्रवास करतात आणि तिथे विचित्र घटनांना सामोरे जातात. 'रागिनी एमएमएस २' हा सिक्केल २०१४ मध्ये प्रदर्शित झाला होता, ज्यामध्ये सनी लिओनी , साहिल प्रेम, संध्या मृदुल आणि कैनाज मोतीवाला यांनी भूमिका केल्या होत्या. हा चित्रपट पहिल्या चित्रपटाचाच एक भाग होता.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जिल्हा परिषद विभागीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवाचा शानदार समारोप

जनसंचलन/बुलढाणा

स्थानीय जिल्हा क्रीडा संकुल येथे पार पडलेल्या जिल्हा परिषद विभागीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवाचा शानदार समारोप व बक्षीस समारंभ शनिवारी सायंकाळी पार पडला. गृह मैदानांचा तसेच स्थानिक प्रेक्षकांच्या भरगच्च प्रतिसादाचा पुरेपूर फायदा घेत यजमान बुलढाणा जिल्हा परिषदेने सर्वसाधारण विजेते पदावर शिक्कामोर्तब केले. तर अमरावती जिल्हा परिषदेने सांघिक कामगिरीच्या बळावर उपविजेतेपद पटकाविले. संगीतमय वातावरण व फटाक्यांची आतिषबाजी अशा उत्साहपूर्ण वातावरणात बक्षीस वितरणाचा कार्यक्रम जल्लोषात पार पडला. बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बक्षीस वितरण समारंभास आमदार धीरज लिंगाडे, अतिरिक्त जिल्हाधिकारी खांदे, उपजिल्हाधिकारी शेलार, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक पांडुरंग कोल्हे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या सुविद्यपत्नी रीपिका खरात.आयोजन समितीचे सचिव तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पवार प्रमोद एंडोले यवतमाळचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आबाळे अकोल्याचे परिहार माध्यमिक शिक्षणाधिकारी अनिल अकाळ योजना विभागाचा शिक्षणाधिकारी डॉक्टर वैशाली ठग जिल्हा जलसंधारण अधिकारी स्नेहल माने. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत. ॲडव्होकेट शर्वरी तुपकर.पाचही जिल्हा परिषदांचे जिल्हा क्रीडा समन्वयक. विविध जिल्हा परिषद खातेप्रमुख व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी मंचावर प्रामुख्याने उपस्थित होते. या विभागीय स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवात बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ व वाशिम या ५ जिल्हा परिषदांच्या सुमारे १५०० खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. उद्घाटन समारंभाच्या दिवशी खेळाडूंनी केलेल्या पथसंचालनात सादर केलेल्या आकर्षक देखाव्यांमध्ये भुकेची कहाणी सादर करणाऱ्या जिल्हा परिषद यवतमाळने




प्रथम क्रमांक पटकाविला तर ॲसिड अटॅक व माय मराठी या विषयावर केलेल्या सादरीकरणास बुलढाणा जिल्हा परिषदेला २-रीय क्रमांकावर समाधान मानावे लागले. वैयक्तिक क्रीडा प्रकारात टेनिक्वाइटमध्ये बुलढाण्याने ६ पारितोषिके पटकावले तर अमरावतीच्या पदरी ५ बक्षिसे मिळालीत. बॅडमिंटन क्रीडा प्रकारात आपली घोडदौड कायम ठेवीत बुलढाणा व अमरावतीच्या चमूने प्रत्येकी ११ प्रकारात विजेतेपद व उपविजेतेपद पटकाविले. सर्वसाधारण विजेतेपदामध्ये सुरू असलेली बुलढाणा व अमरावतीची धावण्याची शर्यत ही धावण्याच्या क्रीडा प्रकारात सुद्धा तुल्यबळ होती. दिव्यांग कर्मचारी गटामध्ये बुलढाणा जिल्हा परिषदेला १२ क्रीडा प्रकारात यश मिळाले. येथे सुद्धा अमरावतीने बुलढाण्याचा पाठलाग करीत १० ठिकाणी यश संपादन केले. क्रिकेट, फुटबॉल, हॉलीबॉल, कबड्डी, खोखो इत्यादी सांघिक क्रीडा प्रकारात सुद्धा तुल्यबळ लढती झाल्या, अखेरीस बुलढाणा जिल्हा परिषदेच्या चमूने सर्वसाधारण विजेतेपद पटकावून अमरावतीला उपविजेतेपदावर रोखले. तर यवतमाळ, अकोला व वाशिम यांना संमिश्र यश मिळाले. सर्व विजेत्या व उपविजेत्या खेळाडूंचा तसेच संघांचा स्मृतिचिन्ह मानपत्र देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.समारंभाच्या अखेरीस मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या हस्ते क्रीडाध्वज ध्वजावतारण करण्यात आले. त्यानंतर सन २०२७ साठी यजमान पदाची धुरा स्वीकारणाऱ्या जिल्हा परिषद वाशिमचे प्रतिनिधी शिक्षणाधिकारी गजानन डाबेराव यांच्याकडे हा क्रीडाध्वज सुपूर्द करण्यात आला. या बक्षीस वितरण समारंभाचे सूत्रसंचालन अरविंद शिंगाडे व किरण वाघमारे यांनी केले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद एंडोले यांनी यशस्वीतेसाठी सहकार्य करणाऱ्या सर्व घटकांचे तसेच मान्यवरांचे आभार व्यक्त केले. राष्ट्रगीताने बक्षीस वितरण समारंभाचा समारोप झाला.

## डोणगाव येथे क्रांतीवीर संत सेवालाल महाराज यांची २८७ वी जयंती उत्साहात साजरी


जनसंचलन/डोणगाव

बंजारा समाजाचे आराध्य दैवत क्रांतीवीर संत सेवालाल महाराज यांची २८७ वी जयंती १५ फ ेब्रुवारी रोजी स्थानिक ग्रामपंचायत कार्यालय येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डोणगावचे सरपंच चरण पाटील आखाडे होते. त्यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपसरपंच श्याम इंगळे, माजी सरपंच जुबेर खान, सद्दाम शहा, राजेश जाधव, तसेच डोणगाव शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष सचिन गाभणे, हमीद भाई मुल्लाजी सुरेश भाऊ फिसके अब्रार मिल्ली यांची प्रमुख उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी



डोणगाव येथील नाईक अनिल राठोड व कारभारी सतीश राठोड यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन राहुल चव्हाण यांनी केले. याप्रसंगी गावातील नागरिक व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बुलढाणा नगरपालिका हद्दवाढ विरोधात पीडित गावांच्या आजी-माजी लोकप्रतिनिधींची संयुक्त निष्पक्ष, निर्भीड बैठक संपन्न!




जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा नगरपरिषद हद्द वाढ प्रस्ताव विरोधात सागवन, सुंदरखेड, येळगाव, माळविहीर येथील आजी माजी लोकप्रतिनिधींनी एकत्र येत आगामी काळातील निष्पक्ष, निर्भीड संघर्षावर सांगोपांग चर्चा करण्यात आली. चर्चेअंती सदरचा नगर पालिका हद्दवाढ प्रस्ताव हा आपल्या गावांवर अन्याय करणारा असून हा प्रस्ताव शासनाने त्वरीत रद्द करावा. गाव बचाव कृती समितीच्या माध्यमातून शासन स्तरावर प्रयत्न करावेत आणि त्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून मंगळवार दिनांक १७/२/२०२६ रोजी जिल्हाधिकारी बुलढाणा यांना भव्य गांवकरी जनआक्रोश मूक मोर्चा काढून निवेदन देण्याबाबत निर्णय करण्यात आला. आणि सदर गावांच्या सार्वभौमत्वाच्या स्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या जुलमी प्रस्ताव जोपर्यंत रद्द होत नाही तोपर्यंत संघर्ष कायम ठेवण्याचे ठरले. यावेळी सागवन, सुंदरखेड, माळविहिर, येळगाव येथून आलेल्या प्रमुख आजी, माजी लोकप्रतिनिधींनी आपापली मते मांडून गावं हिताच्या बाजूने उभे राहण्याचा संकल्प केला.

# बुलढाण्यात संताप उसळला; हर्षवर्धन सपकाळ यांचा पुतळा जाळला!

जनसंचलन/बुलढाणा

हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची तुलना टिपू सुलतान यांच्याशी केल्याच्या कथित वक्तव्यामुळे बुलढाण्यात संतापाचा ज्वालामुखी उसळला. या विधानाच्या निषेधार्थ १५ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १२ वाजता जयस्तंभ चौक येथे भाजपाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात आले. संतप्त कार्यकर्त्यांनी सपकाळ यांच्या प्रतिकात्मक पुतळ्यास चपला-जोडे मारत दहन केले आणि काँग्रेसविरोधी जोरदार घोषणाबाजी केली. भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना संताप व्यक्त केला. ङ्गछत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक आहेत. त्यांच्या कार्याची तुलना कुणाशीही करणे म्हणजे महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचा अवमान आहे. सपकाळ यांनी तात्काळ जाहीर माफी मागावी,फ्र असा इशारा त्यांनी दिला. शहराध्यक्ष मंदार बाहेकर यांनीही काँग्रेसच्या भूमिकेवर सडकून टीका करत सपकाळ यांच्या वक्तव्याचा निषेध केला. या आंदोलनात जिल्हा महामंत्री दत्ता पाटील, जेष्ठ नेते दीपक वारे, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत बरदे, विलास मानवतकर, डॉ. तेजराव नरवाडे, जिल्हा सचिव मुन्नाजी बेंडवाल, मंडळ अध्यक्ष सतीश भाकरे, महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष सौ. उषाताई पवार, महिला शहराध्यक्ष सौ. वर्षाताई पाथरकर, सौ. रंजनाताई कायस्थ, सौ. शोभाताई ढवळे, शिक्षक आघाडी जिल्हा संयोजक संदीप नरोटे, सौ. वेदाताई कथने, अनुसूचित जाती जिल्हाध्यक्ष ॲड. दिगंबर अंभोरे, सहकार आघाडी जिल्हाध्यक्ष ॲड. मोहन पवार, कामगार मोर्चा जिल्हाध्यक्ष दत्ता शिंदे, बाजार समिती संचालक ॲड. सुनील देशमुख, राजेंद्र खरात, अण्णा देवकट्टी, तुषार पडोळ, अरविंद जाधव, ॲड. दशर्थसिंग राजपूत, संजय जुंबड, वैद्यकीय आघाडी जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश्वर उबरहंडे, पवन बगाडे, संजय मोटे, मिलिंद चिंचोळकर, केशव




बेंडवाल, मोहन निमरोट, नितीन दासार, प्रदीप सोनटक्के, राजेंद्र पवार, सुभाष कदम, तुकाराम राठोड, सचिन टेंभिकर, मंडळ अध्यक्ष अनिल जाधव, सारंग एकडे यांसह शेकडो पदाधिकारी व शिवप्रेमी सहभागी झाले होते. आंदोलनामुळे काही काळ जयस्तंभ चौक परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

# विद्यार्थ्यांच्या आत्महत्याप्रकरणी पालकांची बैठक...

जनसंचलन/बुलढाणा

शहरातील भारत विद्यालयात शिक्षण घेणाऱ्या दोन विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याच्या घटनांमुळे शैक्षणिक वर्तुळात खळबळ उडाली आहे. या दोन्ही घटनांमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, पोलिसांकडून सर्व बाजूंनी सखोल तपास सुरू आहे. वाढत्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर रविवारी विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या पालकांची तातडीची बैठक घेण्यात आली. शनिवारी सुंदरखेड येथील राहत्या घरी १४ वर्षीय विद्यार्थी अथर्व राणे याने आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. त्यापूर्वी ११ फेब्रुवारी रोजी त्याच विद्यालयातील नमन राऊत या विद्यार्थ्यानेही आत्महत्या केली होती. अल्पावधीत घडलेल्या या दोन घटनांमुळे पालकवर्ग, शिक्षक आणि प्रशासनात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी पोलिसांकडून तांत्रिक, तसेच इतर सर्व अंगांनी तपास सुरू असून, संभाव्य कारणांचा शोध घेतला जात आहे. तपासासाठी सायबर पोलिसांचीही मदत घेण्यात येत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. दरम्यान, रविवारी आयोजित बैठकीत पोलिस अधिकाऱ्यांनी पालकांशी संवाद साधत विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष देण्याचे आवाहन केले. मुलांशी सातत्याने संवाद ठेवणे, त्यांच्या वर्तनातील बदल लक्षात घेणे आणि कोणतीही संशयास्पद बाब त्वरित कळविणे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांची तसेच पालकांची जबाबदारी अधोरेखित करत शाळा व्यवस्थापन, पालक आणि प्रशासन यांनी समन्वयाने काम करण्याची गरज व्यक्त करण्यात आली. या घटनांमुळे शहरात हळहळ व्यक्त होत असून, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा व मानसिक आरोग्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. तपासाचा निष्कर्ष समोर आल्यानंतरच या घटनांमागील कारण स्पष्ट होणार आहे.

# कालव्यात पोहण्यासाठी गेलेल्या ११ वर्षीय विद्यार्थ्याचा बुडून मृत्यू



जनसंचलन/ चिखली

खडकपूर्णा प्रकल्पाच्या मुख्य कालव्यात पोहण्यासाठी गेलेल्या ११ वर्षीय विद्यार्थ्याचा बुडून मृत्यू झाल्याची घटना १५ फ ेब्रुवारी रोजी सकाळी तालुक्यातील अंचरवाडी शिवारात घडली. स्वराज गणेश खरात (रा. कोलारा) असे मृत मुलाचे नाव आहे. स्वराज हा अंचरवाडी येथील श्री शिवाजी विद्यालयात इयत्ता पाचवीत शिक्षण घेत होता. तो मूळचा कोलारा येथील असून, त्याच्या डोक्यावर आई वडिलांचे छत्र नव्हते. त्याच्या पश्चात एक भाऊ आणि आजी असा परिवार आहे. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने तो अंचरवाडी येथील वसतिगृहात राहून शिक्षण घेत होता. दरम्यान, १५ फेब्रुवारी रोजी शाळेला सुटी असल्याने तो अंचरवाडी शिवारातील खडकपूर्णा उपसा सिंचन योजनेच्या मुख्य कालव्यात पोहण्यासाठी गेला होता; मात्र कालव्यातील पाण्याच्या प्रवाहाचा अंदाज न आल्याने तो पाण्यात वाहून गेला आणि त्यातच त्याचा मृत्यू झाला. कालव्यावर कपडे धुण्यासाठी गेलेल्या महिलांच्या ही बाब निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तत्काळ मदतीसाठी नागरिकांना पाचारण केले; मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले. कालव्यात शोधमोहीम राबविल्यानंतर सुमारे ५० ते ५५ फूट अंतरावर स्वराजचा मृतदेह आढळून आला. आई-वडिलांचे छत्र हरपल्यानंतर वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या या चिमुकल्याच्या मृत्यूमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# भारत-अमेरिका करारावरून जाधव-तुपकर आमनेसामने !

जनसंचलन/बुलढाणा

भारत-अमेरिका यांच्यात झालेल्या व्यापारी करारावरून केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव आणि शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्यात शाब्दिक वाद रंगला आहे. कराराचे समर्थन करताना राज्यमंत्री जाधव म्हणाले की, या कराराला कुणी विरोध करावा की नाही, हा त्यांच्या वैचारिक भूमिकेचा प्रश्न आहे. देशातील अनेक अर्थतज्ज्ञांनी या कराराचे स्वागत केले असून, करार जाहीर होताच शेअर बाजारात सकारात्मक हालचाल दिसून आली. हा करार देशाच्या किंवा शेतकऱ्यांच्या हिताला मारक असता, तर शेअर बाजारात घसरण झाली असती, असे मत त्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केले. या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना रविकांत तुपकर यांनी तीव्र आक्षेप नोंदवला. या व्यापारी करारातील बारकावे तरी राज्यमंत्र्यांना माहीत आहेत का, असा सवाल करत त्यांनी पूर्वीच्या सोयाबीन आयातीच्या मुद्यांचा संदर्भदिला. आयात वाढली की दर वाढतात, असा दावा करण्यात आला होता; मात्र प्रत्यक्षात आयात वाढल्यास दर घसरतात, असा आरोप त्यांनी केला. शेअर बाजाराचा दाखला दिला जात असताना सोयाबीनचे दर ५०० ते १,००० रुपयांनी का घसरले, याचे स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी तुपकर यांनी केली. भूमिपुत्र या मुद्द्यावरूनही त्यांनी जाधवांवर टीका करत, केंद्रात मिळालेले राज्यमंत्रिपद टिकवण्यासाठी केंद्र सरकारची बाजू घेतली जात असल्याचा आरोप केला. या करारामुळे कृषी व औद्योगिक उत्पादनांच्या आयात-निर्यात प्रक्रियेला सुलभता, शुल्कात सवलत आणि गुंतवणुकीला चालना मिळेल केंद्र सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८